प्रभात पुणे, गुरुवार, दि. १० नोव्हेंबर २०२२ || ३

# मॉडर्न इंजिनिअरिंग कॉलेजला सर्वोच्च 'ए प्लस प्लस' श्रेणी

## आता स्वायत्तता आणि विद्यापीठाचा दर्जा मिळविणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९ -** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदे (नॅक) कडून 'ए प्लस प्लस' ही सर्वोच्च श्रेणी प्राप्त झाली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत आणखी मोलाची भर पडली आहे. आता आणखी गुणवत्ता वाढीसाठी महाविद्यालय स्वायत्तता आणि स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

महाविद्यालयाचे विविध सात निकषांवर मूल्यमापन करुन 'नॅक'च्या तिसऱ्या फेरीत महाविद्यालयाला चार पैकी ३.६६ 'सीजीपीए' अर्थात 'क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉइंट ॲव्हरेज' गुण प्राप्त झाले असून राज्यातील महाविद्यालयांमध्ये हे सर्वोच्च मानांकन ठरले आहे. याबाबतची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. डॉ. श्यामकांत देशमुख, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य प्रा. डॉ. कल्याणी जोशी आदींनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली.

शासनाने स्वायत्तता देत असताना कोणतेही निर्बंध लादणे योग्य नाही. अभ्यासक्रम निश्चिती, परीक्षा पद्धती राबविण्याबाबत स्वातंत्र्य देण्याचीही आवश्यकता आहे, असे मतही एकबोटे यांनी व्यक्त केले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कौशल्य विषयक उपक्रमांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देण्यात येत असते, असे प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी यांनी सांगितले.

'एनबीए' कडून सर्व विभागांचे मूल्यमापन करून घेणे, सर्व विभागांमध्ये रिसर्च सेंटर्स सुरु करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासाकरिता राबवल्या जाणाऱ्या इतर उपक्रमांसाठी नव-नवीनराष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर शैक्षणिक करार करणे हे महाविद्यालयाचे ध्येय असणार आहे.

दोन दशकांचा प्रवास करत महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात विविध नवे आयाम व मापदंड उभारले आहेत. महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्राधान्य देण्यात येत असते. महाविद्यालयात आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. प्रशस्त वर्गखोल्या, सुसज्ज अद्ययावत प्रयोगशाळा, संगणक कक्ष, भाषा प्रयोगशाळा, दृकश्राव्य प्रयोगशाळा आहे.

विद्यार्थ्यांमध्ये दर्जेदार शिक्षण रुजवण्यासाठी महाविद्यालय औद्योगिक संस्थांशी आणि उद्योग तज्ज्ञांशी संलग्नित आहे. महाविद्यालयातील समृद्ध व सुसज्ज वाचनालयामध्ये विविध विषयांवरील पुस्तके, नॅशनल व इंटरनॅशनल जर्नल्स, विविध प्रोफेशनल सोसायटीजचे डिजिटल सबस्क्रिपशनस उपलब्ध आहेत.



" मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या दोन महाविद्यालयांना यापूर्वीच स्वायत्तता मिळाली असल्याने तीन महाविद्यालयांचे मिळून समूह विद्यापीठ स्थापन करणेही शक्य होणार आहे. स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेच्या महाविद्यालयांना शासनाने मानाने विद्यापीठाचा दर्जा देण्याच्या हालचाली सुरू झालेल्या आहेत. यात मॉडर्न महाविद्यालयालाही विद्यापीठाचा दर्जा निश्चितपणे मिळणार आहे.

**- डॉ. गजानन एकबोटे,**
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



# 'नॅक' मध्ये 'मॉडर्न' अव्वल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नॅक मूल्यांकन समितीकडून महाविद्यालय आणि विद्यापीठांची तपासणी करून त्यांना श्रेणी दिली जाते. त्यामध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाने ए प्लस प्लस ही श्रेणी मिळविताना ३.६६ सीजीपीए गुण मिळवित राज्यात सर्वाधिक गुण मिळविले. यापूर्वी औरंगाबाद येथील देवगिरी कला व विज्ञान महाविद्यालयाने ३.४९ गुण मिळविले होते. त्याचा विक्रम मोडीत काढून सर्वात जास्त गुण मिळविण्याचा मान पुण्याने राखला असल्याची माहिती प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी दिली.

संस्थेच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी तसेच मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते. या संदर्भात प्राचार्य जोशी म्हणाल्या की, 'गेल्या सहा महिन्यांपासून महाविद्यालयाच्या संपूर्ण टीमने नॅक समितीच्या सर्व कसोट्यांवर सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. नॅक मूल्यांकनामध्ये विद्यार्थी केंद्रित सुविधा व शैक्षणिक दर्जा या बाबींवर अधिक भर असतो. त्यासाठी स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग सिस्टिम्स, विद्यार्थी व पालकांपर्यंत प्रत्येक डॉक्युमेंट पोहोचावे यासाठीची उत्तम यंत्रणा, विद्यार्थ्यांची कॅम्पसमधून होणारी प्लेसमेंट, फिडबॅक मॅनेजमेंट, क्लब अक्टिव्हीटी आदी बाबींवर गेल्या अनेक वर्षांमध्ये भर दिला.

## भविष्यात मॉडर्न अभिमत विद्यापीठ होईल...

ए प्लस प्लस हे मानांकन मिळाल्यानंतर यूजीसीकडून मूल्यांकनाबाबतसुध्दा स्वायतत्ता दिली जाते. त्यामुळे आता यापुढे नॅक मूल्यांकन पुन्हा घेण्याची गरज राहणार नाही, अशी माहिती कार्याध्यक्ष डॉ. एकबोटे यांनी दिली. याशिवाय नव्या शैक्षणिक धोरणानुसार पन्नास वर्षे पूर्ण करणाऱ्या संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात मार्डेन महाविद्यालय हे मॉडर्न अभिमत विद्यापीठ होण्याकडे वाटचाल करत आहे. त्यासाठीच्या पूर्तता शासकीय स्तरावर करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

लोकमत

# नॅक मूल्यांकनात 'मॉडर्न' ठरले टॉप

पॉझिटिव्ह स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नॅक कमिटीकडून तपासणीनंतर दिलेल्या ग्रेडिंगमध्ये पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाने राज्यात सर्वाधिक गुण मिळविले आहे. एप्लसप्लस हे सर्वोच्च ग्रेडिंग आणि चार पैकी तब्बल ३.६६ सीजीपीए गुण मिळविले. यापूर्वी औरंगाबाद येथील देवगिरी कला व विज्ञान महाविद्यालयाने ३.४९ गुण मिळविले होते त्याचा विक्रम मोडीत काढला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी ही माहिती दिली.

महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख, प्राचार्य डॉ. कल्याणी जोशी, तसेच मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य जोशी म्हणाल्या की, गेल्या सहा महिन्यांपासून महाविद्यालयाची संपूर्ण टीम नॅक कमिटीच्या सर्व कसोट्यांवर प्रचंड मेहनत घेतली.

ए प्लस प्लस हे मानांकन मिळाल्याने यापुढे नॅकचे मूल्यांकन पुन्हा घेण्याची गरज राहणार नाही, अशी माहिती कार्याध्यक्ष एकबोटे यांनी दिली. तसेच भविष्यात मार्डर्न महाविद्यालय हे मॉडर्न अभिमत विद्यापीठ होण्याकडे वाटचाल करीत आहे. त्यासाठीची पूर्तता शासकीय स्तरावर करण्यात येत आहे.

Hello Pune
Page No. 1 Nov 10, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला 'अ++' दर्जा

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेतर्फे (नॅक) 'अ++' ही सर्वोत्कृष्ट श्रेणी देण्यात आली आहे. महाविद्यालयाने चार पैकी ३.६६ गुण मिळवले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कुठल्याही महाविद्यालयापैकी हे सर्वोत्तम गुण आहे, असे सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. गजानन एकबोटे यांनी सांगितले. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. एकबोटे बोलत होते. यावेळी महाविद्यालय विकास समितीच्या प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. शमाकांत देशमुख, प्राचार्या डॉ. कल्याणी जोशी आदी उपस्थित होते. नॅकच्या चमूने १९ आणि २० ऑक्टोबरला महाविद्यालयाला भेट देऊन सर्वेक्षण केले.

Pune, Main
10/11/2022 Page No. 4

# मॉडर्न अभियांत्रिकीला सर्वोच्च मानांकन

**पुणे** : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) 'ए प्लस प्लस' श्रेणी देण्यात आली. महाविद्यालयाला चार पैकी ३.६६ सीजीपीए गुण प्राप्त झाले असून, राज्यातील महाविद्यालयांमध्ये हे सर्वोच्च मानांकन आहे.

प्राचार्या डॉ. कल्याणी जोशी यांनी ही माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सचिव डॉ. शामकांत देशमुख या वेळी उपस्थित होते. विविध सात निकषांवर मूल्यमापन करून महाविद्यालयाला तिसऱ्या फेरीत ए प्लस प्लस श्रेणी देण्यात आली. डॉ. एकबोटे म्हणाले, की राज्यातील कोणत्याही महाविद्यालयाला ३.६६ सीजीपीए गुण नाहीत. या श्रेणीमुळे आता महाविद्यालयाला स्वायत्तता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दोन महाविद्यालयांना स्वायत्तता असल्याने समूह विद्यापीठ स्थापन करणे शक्य होऊ शकेल.

लोकसत्ता
Thu, 10 November 2022
https://epaper.loksatta.com/c/70818498

केसरी

# मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला ए++ श्रेणी

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला 'नॅक' बंगळुरुकडून ए++ श्रेणी प्राप्त झाली आहे. नॅकने केलेल्या पहाणीत महाविद्यालयाने ४ पैकी ३.६६ सीजीपीए गुण मिळवले आहेत. मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळालेले हे गुण महाराष्ट्रात आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कुठल्याही महाविद्यालयांपैकी सर्वोत्तम गुण आहेत, अशी माहिती प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे सचिव प्रा. शामाकांत देशमुख, संस्थेच्या उपसचिव प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्राचार्या प्रा. डॉ. कल्याणी जोशी उपस्थित होते.

नॅकच्या पथकाने १९ आणि २० ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाला भेट देऊन सर्वेक्षण केले. नॅकच्या तिसऱ्या फेरीत वेग-वेगळ्या सात निकषांच्या आधारांवर हे मुल्यांकन करण्यात आले व त्यानुसार २०२२ ते २०२७ वर्षासाठी महाविद्यालयाला ए++ ही श्रेणी देण्यात आली. १९९९ ते २०२२ या दोन दशकांच्या प्रवासात मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाने शिक्षणिक क्षेत्रात अनेक नवे आयम व मापदंड उभारले. सर्वोत्तम विद्यार्थी व सुजाण नागरिक घडवले. शंकरराव कानिटकर यांनी शिक्षण प्रसाराचा ध्यास घेऊन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षण प्रसाराच्या या परंपरेचा वारसा पुढे नेत संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी १९९९ साली मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. याच महाविद्यालयाने पुण्यातील अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

> महाविद्यालयाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. नॅकने दिलेली ही श्रेणी २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी आहे. महाविद्यालयाला आगामी काळात स्वायत्ता मिळेल. तसेच विद्यापीठाचा दर्जाही प्राप्त होईल. यापुढे एनबीएकडून सर्व विभागांचे मूल्यमापन करून घेणे, सर्व विभागांमध्ये संशोधन केंद्र सुरू करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर शैक्षिणक करार करणे हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट असणार आहे. याबरोबरच नवीन राष्ट्रीय धोरणांची अंमलबजावणी व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ऑटोनॉमी स्टेट्स प्राप्त करण्यासठी प्रयत्न राहणार आहेत.
>
> **- प्रा. डॉ. गजानन एकबोटे,**
> **कार्याध्यक्ष प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी**

Activate Windows
Go to Settings to activate Windows.

नवभारत

## प्रोग्रेसिव एजुकेशन सोसायटी द्वारा संचालित कॉलेज

# मॉडर्न इंजीनियरिंग को नैक का A++ ग्रेड

■ **पुणे, नवभारत न्यूज नेटवर्क.** प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी द्वारा संचालित मॉडर्न इंजीनियरिंग कॉलेज को 'नैक' की ओर से ए++ ग्रेड दिया गया है. नैक की ओर से किए गए सर्वे में इस कॉलेज को 4 में से 3.66 सीजीपीए स्कोर प्राप्त हुआ है. यह जानकारी प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे ने दी. इस संदर्भ में जानकारी देने के पीईएस की ओर से प्रेस वार्ता का आयोजन किया गया. प्रेस वार्ता में प्रोग्रेसिव एजुकेशन की सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सचिव शामकांत देशमुख, इंजीनियरिंग कॉलेज की प्राचार्य प्रा. डॉ. कल्याणी जोशी आदि उपस्थित थे. डॉ. एकबोटे ने बताया कि, शिक्षकों द्वारा स्थापित प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी अपनी स्थापना से ही काफी बेहतरीन शिक्षा प्रसार का कार्य कर रही है. इस संस्था के कई सारे कॉलेजों को पहले ही नैक द्वारा उच्चत्तम श्रेणियां दी गई है. शिक्षा के इस कार्य में हम जरुरतमंद और गरीब-मध्यवर्ग के बच्चों को काफी कम फीस में पढ़ाने का कार्य करते हैं. यहां पर छात्रों के सर्वांगीण विकास के प्रयास किए जाते हैं.

## छात्रों के सर्वांगीण विकास के प्रयास



- प्रा. डॉ. कल्याण जोशी ने बताया कि, 1999 में स्थापित मॉडर्न इंजीनयिरिंग कॉलेज ने अब तक इंजीनियरिंग की शिक्षा प्रदान में कई माइल स्टोन स्थापित किए हैं.
- नैक की ओर से किए गए सर्वे में हमें जो सीजीपीए स्कोर प्राप्त हुआ वह महाराष्ट्र के किसी भी इंजीनियरिंग कॉलेज को प्राप्त अंकों में सर्वाधिक है.
- इस कॉलेज में आज उच्च कोटि की सुविधाएं मौजूद है तथा बेहतरीन शिक्षा और अनुसंधान का कार्य यहां होता है.
- प्लेसमेंट और पेटेंट के संदर्भ में भी हमने काफी प्रगति की है. यही कारण है कि, इस कॉलेज को ए++ ग्रेड प्राप्त हुआ है.

Pune Edition
11-november-2022 Page No. 2
epaper.enavabharat.com

सकाळ

### नॅक पथक : महाविद्यालयाला चारपैकी ३.६६ गुण; डॉ. गजानन एकबोटे यांची माहिती

# मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला 'अ++' दर्जा

पुणे, ता. १० : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या 'मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग'ला राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेतर्फे (नॅक) 'अ++' ही सर्वोत्कृष्ट श्रेणी मिळाली आहे. महाविद्यालयाने चारपैकी ३.६६ गुण मिळवले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कुठल्याही महाविद्यालयांपैकी आम्हाला सर्वोत्तम गुण आहे, असे सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी सांगितले.



महाविद्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. एकबोटे बोलत होते. यावेळी महाविद्यालय विकास समितीच्या प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. श्यामकांत देशमुख, प्राचार्या डॉ. कल्याणी जोशी उपस्थित होते. नॅकच्या पथकाने १९ आणि २० ऑक्टोबरला महाविद्यालयाला भेट देऊन पाहणी केली होती.

डॉ. एकबोटे म्हणाले, "महाविद्यालयाचा दर्जा स्पष्ट करणारी सर्वोत्तम श्रेणी आम्ही प्राप्त केली आहे. अध्ययन-अध्यापन पद्धती, संशोधन, नवोपक्रम आणि नेतृत्व विकासाबरोबरच उत्कृष्ट सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहेत. दोन दशकात शिक्षणाचा प्रसार करत महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात अनेक नवे आयाम व मापदंड उभारले आहेत." नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबरोबरच महाविद्यालयाला स्वायत्तता मिळविण्याकडे आमची वाटचाल असेल, असे डॉ. एकबोटे यांनी स्पष्ट केले. संशोधन आणि उद्योगांच्या सहभागासाठी महाविद्यालयांच्या वतीने विविध शैक्षणिक संस्था, उद्योग आणि संशोधन संस्थांशी करार केल्याचे डॉ. जोशी यांनी सांगितले.

प्रत्येक विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्याच्या विकासासाठी अविरत प्रयत्न करणे व त्यास तंत्रपारंगत करणे याकरिता महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असल्याचे डॉ. एकबोटे यांनी सांगितले. ते म्हणाले, "महाविद्यालयात सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. ज्यात प्रशस्त वर्गखोल्या, सुसज्ज अद्ययावत प्रयोगशाळा, संगणक कक्ष, भाषा प्रयोगशाळा, दृकश्राव्य प्रयोगशाळा आहे. सर्व विभागांत सेमिनार हॉल असून, विद्यार्थी वर्षभर शैक्षणिक आणि अवांतर उपक्रम राबवतात. सोबतच करिअरसंबंधी मार्गदर्शन करण्यात येते." व्यवसायाभिमुख शिक्षणासाठी महाविद्यालयाने औद्योगिक संस्थांशी आणि उद्योग तज्ज्ञांशी सामंजस्य वाढविल्याचे तसेच समृद्ध व सुसज्ज वाचनालयामध्ये विविध विषयांवरील पुस्तके, नॅशनल व इंटरनॅशनल जर्नल्स, विविध प्रोफेशनल सोसायटीजचे डिजिटल सबस्क्रिपशनस उपलब्ध केल्याचेही डॉ. एकबोटे यांनी सांगितले.

Pune, Pune-Today
11/11/2022 Page No. 4